# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०१/११/२०२४ (शुक्रवार) दुपार

## पोस्टे वेलतूर हद्दीतील मौजा कन्हान नदीचे शिवार येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

दिनांक ३१/१०/२०२४ रोजी पोस्टे वेलतूर येथील स्टाफ पोस्टे परिसरात प्रोव्हिशन रेडकामी फिरत असताना मुखबिर कडुन विश्वसनिय खबर मिळाली कि, वेलतूर हद्दीतील मौजा राजोला कन्हान नदीचे किनाऱ्याजवळ १ इसम मोहाफुल गावठी हातभट्टी ची दारु गाळत आहे. अशा खबरे वरुन राजोला कन्हान नदीचे किनाऱ्याजवळ रेड कारवाई करून मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारा **आरोपी नामे— रोहीत रतन रामटेक वय २७ वर्ष रा लोहारा ता. जि. भंडारा** हा कन्हान नदीचे किनाऱ्याजवळ मोहाफुल गावठी हातभट्टी लावुन दारू गाळतांनी दिसुन आला. आरोपीचे ताब्यातून १) ३४० लिटर मोहाफुल हातभट्टी गावठी दारू अंदाजे किमत ३४०००/— रू २) ०१ लोखंडी ड्रम अंदाजे किंमती २०० रू, ३) ०१ जर्मन कटोरा अंदाजे किंमती १५० रू., ४) ०१ लाकडी साचे ५) ०४ प्लॅस्टीक पिशवीमध्ये मोहाफुल १२० लिटर मोहाफुल सडवा प्रती लिटर ३५ रूपये एकुण अंदाजे किंमती ४२०० रू, ६) जलावु लाकडे अंदाजे किमती ५०० रू., ७) १ प्लॅस्टीक पाईप ८) खाली रबरी टयुब ०२ नग असा एकुण ३९,०५०/— रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपी विरुद्ध पो.स्टे वेलतूर येथे कलम ६५ (फ), (क), (ई), (ब), (ड) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर